# प्रेसनोट

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/ १८९७ /२०२०
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
दिनांक -३ /०८/२०२०.

## कैदयास मारहाण करणाऱ्या फरार कारागृह अधीक्षकास स्थानिक गुन्हा शाखच्या पथकाने घेतले ताब्यात.

सावंतवाडी कारागृह येथे असलेल्या कैदी राजेश गांवकर, रा. देवगड यांस माराहाण करुन त्याचे मृत्युस कारणीभुत झालेल्या तत्कालीन सावंतवाडी कारागृह अधीक्षक, योगेश पाटील याचे विरुध्द सावंतवाडी पोलीस ठाणे येथे भा.द. वि. कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीत हा फरार होऊन अटक चुकवित होता. तसेच वारंवार आपली राहण्याचे ठिकाणी व मोबाईल क्रमांक बदलत असल्याचे स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकास निदर्शनास आले होते.गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीत योगेश पाटील यांस अटक करणेकामी श्री. दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस तपास पथके नेमण्यात आली.

आरोपी कारागृह अधीक्षक योगेश पाटील, यांचेबाबत सर्वतोपरी माहिती प्राप्त केल्यानंतर आरोपीत हा नागपूर येथे वास्तव्यास असल्याचे पोलीस तपास पथकाचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. सुनिल धनावडे, स्थानिक गुन्हे शाखा, सिंधुदुर्ग यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री. सचिन शेळके, यांचे नेतृत्वाखाली तपास पथक नेमले. सदर तपास पथकाने आरोपीत योगेश पाटील यांस त्याचे राहते घरातुन दिनांक ०२/०८/२०२० रोजी १९.२५ वाजता नागपूर येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेतले.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री. दिक्षित गेडाम, पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग व श्री. तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, प्रमुख श्री. सुनिल धनावडे यांचे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. शेळके, पोलीस कर्मचारी गुरुनाथ कोयंडे, श्री. रवि इंगळे, श्री. सत्यजित पाटील, श्री. संकेत खाडये, यांनी केलेली आहे.

( एस.के.धनावडे )
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी,सिंधुदुर्ग.

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी
सिंधुदुर्ग